# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


जा.क्र.शिउसं/उमाशि-२/ना.ह.प./पुवि/२०१७/ ६८७३

दिनांक :- 28/sept/2017.

प्रति,

**प्राचार्य/प्राचार्या,**
**सर्व (अनुदानित) अशंतः अनुदानित/विना अनुदानित**
**उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,**
**(बिगर अल्पसंख्यांक) पुणे**

**विषय:-** उच्च माध्यमिक शाळा कर्मचारी भरतीस नाहरकत प्रमाणपत्र प्रस्तावाबाबत

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र एसएसएन-२०१४/(१/१४)टिएनटी-२ दि. २०.०६.२०१४ व दि. १९.०७.२०१४
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक एसएसएन-२०१४/(१/१४)/टीएनटी-२ दि.०४.०६.२०१६
३) शासन निर्णय क्र.एसएसएन-१००७/(३६/७)/माशि-२ दि.०६.०२.२०१२
४) मा.शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे यांचे पत्र दि.उच्च माध्य-२४१/नाहरकत प्रस्ताव/१६/८२६४ दि. २४.११.२०१६.
५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/उमाशि-२/नाहरकत प्रमाणपत्र/पुवि/२०१६/ दिनांक २५.११.१६
६) शासन निर्णय क्र-सीईटी-२०१५/प्र.क्र.१४१/टीएनटी-१ दि. २३.०६.२०१७
७) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष दि.२५.०५.२०१७.
८) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.-९४/अर्थ-३ दि.३०.०६.१७
९) मा.आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र जा.क्र.उच्च माध्य-२४१/ना.ह.प/२०१७/४७०७ दि. २९.०८.२०१७.
१०) मा.आयुक्त(शिक्षण) म.रा.पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/नाहप्र/२०१७/ ४७०७ दि. २९.०८.२०१७

उपरोक्त विषयानुसार पुणे विभागातील पुणे, अहमदनगर, सोलापूर जिल्हयातील ज्या संस्थेने किंवा कनिष्ठ महाविद्यालयाने दिनांक ०२ मे २०१२ नंतर (बिगर अल्पसंख्यांक) अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित पुर्णवेळ शिक्षण सेवक / शिक्षक यांचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव विहित नमुन्यात भरुन या कार्यालयाकडे सादर केलेला होता असे सर्व प्रस्ताव मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेले होते. तथापि, मा.आयुक्त (शिक्षण)म.रा. पुणे यांचे संदर्भ क्र-१० च्या पत्रानुसार स्थानिक संस्थासह स्वराज्य खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित,अंशतः अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षणसेवक भरती अभियोग्यता चाचणीद्वारे गुणांच्या आधारावर (पवित्र संगणक प्रणालीद्वारे) करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे तसेच यापुढील काळात शाळांमधील शिक्षक भरती अभियोग्यता चाचणीच्या माध्यमातुन करणे बंधनकारक आहे.

तसेच संदर्भ क्र-७ नुसार जे प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजुर मंजुर करुन घेणार नाहीत तोपर्यंत त्या बिभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही.

संदर्भ क्र-८ नुसार क्षेत्रिय अधिका-यांनी शासनाच्या मान्यतेशिवाय कोणत्याही शिक्षक/शिक्षकेत्तर पदांना मान्यता देऊ नये, शिक्षण संस्थांनी परस्पर शिक्षकांची भरती करु नये. असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त तरतुद लक्षात घेता शासनाने पदभरतीस निर्बंध केलेले असल्यामुळे व यापुढे शाळांमधील पदभरती पवित्र संगणक प्रणालीच्या माध्यमातून करावयाची असल्यामुळे, उच्च माध्यमिक शाळांमधील पदे भरण्यास परवानगी देणे योग्य ठरणार नाही तसेच या कार्यालयामार्फत मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेले सर्व प्रस्ताव परत देण्याबाबत संदर्भिय पत्र क्र-१० अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तरी पुणे जिल्हयातील या कार्यालयास नाहरकत प्रमाणपत्रासाठी प्राप्त झालेले सर्व मुळ प्रस्ताव **दिनांक ०३.१०.२०१७ रोजी आबेदा इनामदार कनिष्ठ महाविद्यालय, मुलींचे, कॅम्प, पुणे-१** येथे होणा-या विशेष शिबीरातुन घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी. जे कनिष्ठ महाविद्यालय आपला नाहरकत प्रमाणपत्रासाठी सादर केलेला प्रस्ताव सदर शिबीरातुन घेऊन जाणार नाहीत असे प्रस्ताव दप्तरी दाखल करुन घेतले जाणार आहेत तरी आपले प्रस्ताव घेऊन जाण्याची दक्षता घेण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
२) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे